MHAU080036672024

<u>म.कौ.हिं.सं.का. अर्ज क्र. २७/२०२४ मधील नि.क्र. ०७ खाली आदेश</u>

*(हिना वि. जावेद व इतर)*

प्रस्तुतचा अर्ज गैरअर्जदारांनी त्यांचा लेखी जबाब व म्हणणे दाखल करण्यास परवानगी मिळण्याकरिता दाखल केला आहे.

**०२.** गैरअर्जदारांचे कथन की, प्रस्तुत प्रकराात गैरअर्जदारांना दि. २५/१०/२०२४ नोटीस तामील झालेली आहे. सदर नोटीस तामील झाल्यानंतर काही कागदपत्रांमुळे तसेच गैरअर्जदाराचे आई–वडील आजारी असल्याने गैरअर्जदार लेखी जबाब व म्हणणे मुदतीत दाखल करु शकले नाही. शेवटी गैरअर्जदारांनी त्यांचा लेखी जबाब व म्हणणे दाखल करण्याची परवानगी मिळण्याबाबत विनंती केली आहे.

**०३.** अर्जदाराने प्रस्तुत अर्जावर नि.क्र. ०८ नुसार तिचे म्हणणे दाखल केले. अर्जदाराचे कथन की, गैरअर्जदारांनी केलेला अर्ज हा खोटा, बनावटी व काल्पनीक असुन तो न्यायालयाची दिशाभुल करुन अर्जदारास मानसिक त्रास देण्याकरिता व प्रकरण लांबविण्याकरिता दिला आहे. प्रस्तुत अर्जावर गैरअर्जदारांपैकी एकाही गैरअर्जदाराची स्वाक्षरी नाही किंवा अर्जास पुष्टी देण्याकरिता कोणाचेही शपथपत्र दाखल केलेले नाही. यावरुन गैरअर्जदारांनी सदरचा अर्ज दिलेला नसुन ते सदर अर्ज देण्याकरिता न्यायालयात देखील आलेले नाहीत. गैरअर्जदारांनी त्यांच्या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. गैरअर्जदारांना दि. १८/१०/२०२४ रोजी नोटीस तामील झाली व त्यानंतर गैरअर्जदारांनी दि. २५/१०/२०२४ रोजी त्यांचे विधीज्ञामार्फत न्यायालयात हजर होऊन लेखी म्हणणे दाखल करण्यासाठी अर्ज दिला आहे. त्यानंतर न्यायालयाने वेळोवेळी संधी देऊन देखील गैरअर्जदारांनी त्यांचे म्हणणे अभिलेखावर दाखल केलेले नाही. न्यायालयाने

गैरअर्जदारांना त्यांचे लेखी म्हणणे दाखल करण्यासाठी पूर्ण संधी दिलेली असुन त्यांनी त्यांचे म्हणणे दाखल केलेले नाही. गैरअर्जदारांनी आता फक्त केवळ प्रकरण लांबविण्याकरिता व अर्जदारास मानसिक त्रास देण्याच्या हेतुने प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. शेवटी अर्जदाराने गैरअर्जदारांचा अर्ज फेटाळुन त्यांना रक्कम रु. २०,०००/– चा दंड लावण्याची विनंती केली आहे.

**०४.** प्रस्तुतचा अर्ज, त्यावरील म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. अर्जदारा हिने गैरअर्जदारांविरुध्द कौटूंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम , २००५ चे कलम १२–अ अन्वये अर्ज करुन विवीध अनुतोषांची मागणी केलेली आहे. प्रकरणात गैरअर्जदार यांचेवर नोटीसची बजावणी झाल्यानंतर ते दि. २५/१०/२०२४ रोजी हजर झाले मात्र त्यांनी विहीत मुदतीत त्यांचे म्हणणे दाखल केले नाही. मात्र सदर प्रकरणात गैरअर्जदारांचे विरुध्द विनाकैफीयत खुलासा आदेश पारीत करण्यात आलेला नाही. केवळ विहीत मुदतीत कैफीयत खुलासा दाखल नसल्याने गैरअर्जदार यांनी प्रस्तुत अर्ज दाखल केलेला आहे.

**०५.** प्रस्तुत प्रकरण हे कौटूंबिक प्रकरण असल्यामुळे वस्तुस्थिती अभिलेखावर येण्याकरिता आणि प्रकरणाचा निकाल गुणवत्तेवर पारीत होण्याकरिता गैरअर्जदार यांना कैफीयत खुलासा दाखल करण्याची संधी देणे आवश्यक वाटते. तसे केल्यास अर्जदार हिचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट प्रकरण गुणवत्तेवर निकाली निघण्यास मदत होईल. करिता प्रस्तुत अर्ज मंजुर करणे न्यायोचित वाटते. म्हणुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे :–

## आदेश

गैरअर्जदार यांना त्यांचा कैफीयत खुलासा दाखल करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

KAILAS TRYAMBAK ADHAYKE

Digitally signed by KAILAS TRYAMBAK ADHAYKE
Date: 2025.07.16 15:55:44 +0530

दि. १६/०७/२०२५

(कैलास त्र्यं. अढायके)
न्यायदंडाधिकारी, प्र. वर्ग, सिल्लोड.